MHSO100002832019

# <u>नि.दि.दा.क्र.०७/२०१९ मधील नि.क्र.१३६ खालील आदेश.</u>

वादींनी सदरचा अर्ज वादीचा पुढील सरतपास घेण्यास परवानगी मिळण्यासाठी केलेला आहे. वादींनी सदरच्या अर्जात कथन केले आहे की, सदरचा दावा पुर्ववत फैलावर आलेला आहे. सदरच्या दाव्यात वादीचे पुराव्याचे शपथपत्र पुर्वी दिलेले आहे, परंतु काही कागदपत्र शाबीत करण्यासाठी वादीचा पुढील सरतपास घेणे आवश्यक आहे. वादी हा मागच्या तारखेला म्हणजेच ता.०२.०९.२०२४ रोजी डेंग्यु सदृश्य आजाराने आजारी असल्यामुळे न्यायालयात येऊ शकला नव्हता. त्यामुळे न्यायालयाने त्यांच्याविरुध्द 'जादा सरतपास नाही' असा आदेश पारित केला आहे. वादींना पुराव्याच्या दृष्टीने जुनी कागदपत्र शाबीत करणे आवश्यक आहे. त्यामुळे 'जादा सरतपास नाही' हा त्यांच्याविरुध्द झालेला आदेश रद्द करण्यात येऊन वादीला पुढील सरतपास घेण्यास परवानगी मिळणे आवश्यक आहे. सदरचे दाव्याचा गुणवत्तेवर न्यायनिर्णय होण्यासाठी वादींविरुध्द 'जादा सरतपास नाही' हा झालेला आदेश रद्द होऊन मिळणे व वादीची पुढील सरतपासणी घेण्यास परवानगी देणे आवश्यक आहे. म्हणून त्यांनी त्यांचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. सदरचे अर्जास प्रतिवादींनी जबाब दिलेला असून त्यामध्ये त्यांनी कथन केले आहे की, सदरच्या अर्जास त्याची सक्त हरकत आहे. सदरच्या अर्जात दिलेले कारण योग्य व बरोबर नाही. वादींनी पुर्वी सरतपासाचे शपथपत्र दिलेले आहे. वादी हा न्यायालयात उपस्थित न

राहिल्यामुळे त्याच्याविरुध्द जादा सरतपास नाही चा आदेश पारित करण्यात आला आहे. सदरचा आदेश योग्य आहे. त्यामुळे सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा.

३. वर नमूद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्यावर मी माझे कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहे.

| आ.क्र. | मुद्दे | | मुद्दे |
|---|---|---|---|
| १. | वादींविरुध्द झालेला ''जादा सरतपास नाही'', हा आदेश रद्द करुन पुढील सरतपासणी घेण्यास परवानगी देणे आवश्यक आहे काय? | ... | होय. |
| २. | आदेश काय? | ... | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमीमांसा

### मुद्दा क्र.१ बाबतः–

४. मी वादींतर्फे विद्वान वकील श्री.फडे व प्रतिवादींतर्फे विद्वान वकील श्री.तांबोळी यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच सदरच्या प्रकरणांमधील संबंधीत दस्तऐवज पाहिले. सदरचा दावा हा ता.०१ जून, २०२३ रोजी

पुर्ववत फैलावर घेण्यात आल्याचे दिसून येते. त्यानंतर वादी क्र.१ ने त्याचे पुराव्याचे शपथपत्र ता.२७.०७.२०२३ रोजी नि.क्र.१२४ वर दाखल केले आहे. त्यानंतर ता.०६.०१.२०२४ पासून वादीच्या उलटतपासासाठी सदरच्या दाव्याचे कामकाज ठेवण्यात आल्याचे दिसून येते. त्यानंतर ता.०९.१०.२०२४ रोजी वादींनी सदरचा नि.क्र.१३६ चा अर्ज देऊन त्याच्याविरुध्द 'जादा सरतपास नाही' हा आदेश रद्द करुन मिळण्यासाठी व वादी क्र.१ ची पुढील सरतपासणी घेण्याची परवानगी मिळण्यासाठी दिला आहे.

५. सदरचे दाव्यातील संबंधीत दस्तऐवज पाहील्यावर दिसून येते की, वादीने त्याची पुढील सरतपासणी न घेतल्यामुळे त्याच्या उलटतपासणीसाठी सदरच्या दाव्याचे कामकाज ठेवल्याचे दिसून येते. सदरचा दावा पुन्हा फैलावर घेण्यात आल्यामुळे व वादींना काही दस्तऐवज शाबीत करावयाचे असल्यामुळे पुढील सरतपास घेणे आवश्यक आहे. वादींनी जाणीवपुर्वक वादीची पुढील सरतपासणी घेण्यास टाळाटाळ केली नाही. त्यामुळे वादींच्या सदरचे अर्जातील कारण हे योग्य व संयुक्तीक आहे. सदरचे मूळ दाव्याचे कायमचे निराकरन करण्यासाठी व वादींना त्यांची बाजू मांडणेसाठी संधी देणेसाठी त्यांच्याविरुध्द झालेला ''जादा सरतपास नाही'' चा आदेश रद्द होणे न्यायाच्या हितार्थ आवश्यक आहे. वादींना जर सदरची संधी देण्यात आली नाही तर त्यांना न्याय नाकारलेसारखे होईल. तसेच दोन्ही पक्षकारांचा पूर्ण पुरावा न्यायालयासमोर आला तर न्यायालयाला योग्य न्यायनिवाडा करणे सोयीचे होईल वादींना पुढील सरतपासणीची संधी दिली

तर प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्यास सोयीचे होईल. त्यामुळे वादींविरुध्द झालेला ''जादा सरतपास नाही'' चा आदेश रद्द करणे व त्यांना पुढील सरतपासणी घेण्यास परवानगी देणे आवश्यक आहे. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर 'होकारार्थी' नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२ बाबतः–**

६. मी वर नमुद केल्याप्रमाणे, सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणुन मी मुद्दा क्र.२ चे उत्तरासाठी खालील अंतिम आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

सदरचा नि.क्र.१३६ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by GHANWAT SOPAN DASHRATH
Date: 2026.04.24 17:25:15 +0530

दि.२४.०४.२०२६.

(सोपान द.घनवट)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
माळशिरस.

५ **<u>नि.दि.दा.क्र.०७/२०१९ मधील</u>**

**<u>नि.क्र.१३६ खालील आदेश</u>.**

शेरा

मी शपथेवर सांगते की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नावःश्री. म. पां. सदाफुले.

न्यायालयाचे नावःदि. न्या. व. स्तर, माळशिरस.

आदेशाचा मजकूर सांगितल्याचा दि.२४.०४.२०२६.

आदेश टंकलिखित केलेला दि.२४.०४.२०२६.

आदेश स्वाक्षरित केल्याचा दि.२४.०४.२०२६.

आदेश अपलोड केल्याचा दि.२४.०४.२०२६.

स्वाक्षरित/–

(श्री. म. पां. सदाफुले )

लघुलेखक ग्रेड – २,

दिवाणी न्यायालय, व. स्तर, माळशिरस.